# नियामक मंडळाची १८ वी बैठक दि.२३.०९.९९

मा. ना. एकनाथरावजी खडसे, मा. मंत्री (पा) व अध्यक्ष यांच्या अध्यक्षतेखाली नियामक मंडळाची १८ वी बैठक दि.२३.०९.९९ रोजी मुंबई येथे संपन्न झाली. सदर बैठकीमध्ये खालील ठराव पारित करण्यात आले.

ठराव क्र. १८/१

''ठराव करण्यात येतो की १७ व्या बैठकीमध्ये पारित झालेले ठराव क्र.१७/१ ते १७/११ कायम करण्यात येत आहेत.''

ठराव क्र.१८/१(अ)

'' ठराव करण्यात येतो की, महामंडळाच्या कार्यक्षेतील प्रकल्पांसाठी सामाजिक व आर्थिक अभ्यास करण्यासाठी 'मिटकॉन पुणे', या संस्थेचे पदाधिकारी व महामंडळाचे वरिष्ठ अधिकारी यांनी मा.विनय बन्सल, प्रधानसचिव (नियोजन) व सदस्य यांच्याबरोबर केलेल्या चर्चेच्या अनुषंगाने, सामाजिक व आर्थिक अभ्यासासाठी 'मिटकॉन, पुणे' या संस्थेस रु.३८.७५ लक्ष इतका मोबदला देण्यास नियामक मंडळाची मान्यता देण्यात येत आहे. ह्या मोबदल्यात त्यांनी पूर्वीच्या करारनाम्यात निश्चित केलेल्या कार्यक्षेनुसार सर्व कामे करावयाची आहेत.''

ठराव क्र. १८/२

''ठराव करण्यात येतो की, परिशिष्ट क्र.२ मधील बिगर सिंचन पाणी पुरवठा परवाने मिळण्याबाबतच्या ३ योजनांचे प्रस्तावांपैकी मौ.भिवर्गी व इतर २ गावे प्रादेशिक नळ पाणी पुरवठा योजना ता.जत वगळून उर्वरित २ औद्योगिक पाणी पुरवठा योजनांच्या प्रस्तावांस, सदर प्रस्तावांचा पाणी वापर संबंधित प्रकल्पांच्या सुधारित जल नियोजनामध्ये समाविष्ट केला जाईल व दोन महिन्यांच्या पाणीपट्टीइतकी अनामत रक्कम पाणीवापर करणारी संस्था, महामंडळाकडे भरेल. तसेच १९९० च्या शासन निर्णयानुसार आवश्यक तो संतुलन साठा (Balancing storage) स्वखर्चाने करील, या अटींवर नियामक मंडळाची मान्यता देण्यात येत आहे.''

ठराव क्र. १८/२ (अ)

''ठराव करण्यात येतो की, महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या ज्या योजनांना आतापर्यंत मंजुरी दिली आहे, त्या योजनांपोटी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडून थकीत असलेली संपूर्ण रक्कम महामंडळास प्राप्त झाल्याशिवाय, मंजुरीचे आदेश निर्गमित करु

नयेत. तसेच पुढील बैठकीत महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडून येणारी थकीत रक्कम व वसूल झालेली रक्कम व त्या संदर्भात केलेली कार्यवाही याचा तपशील मांडण्यात यावा.''

ठराव क्र. १८/३

''ठराव करण्यात येतो की, परिशिष्ट क्र.४ मधील १ मोठा, ६ मध्यम व २९ लघु प्रकल्पांच्या, सुधारित अंदाजपत्रकांवर इं.श्री.त्रि.देवकुळे, निवृत्त प्रधान सचिव व सल्लागार (महामंडळ) यांचे अभिप्राय घेण्यात यावेत. यामध्ये सल्लागारांनी त्यांच्या अभिप्रायात मुख्यत्वे १.किमतीतील वाढीबाबतची रास्तता २.व्याप्तीतील बदल व ३.संकल्पनातील बदल याबाबतचे अभिप्राय द्यावेत व त्यानुसार सल्लागारांनी शिफारस केलेल्या प्रकल्पांची सुधारित अंदाजपत्रके नियामक मंडळाचे पुढील बैठकीत मंजुरीसाठी सादर करावीत.''

ठराव क्र. १८/४

''ठराव करण्यात येतो की, १. भ्रातृ मंडळ, पुणे २.पुणे जिल्हा पाटबंधारे अभियंता सहकारी पतसंस्था, पुणे ३.विवेकानंद इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी, पुणे यांनी मागणी केलेली जमीन ३० वर्षासाठी प्रचलित शासकीय नियमाप्रमाणे वार्षिक भाडेपट्टयाने देण्यास मान्यता देण्यात येत आहे. तसेच ४.श्री छत्रपती सहकारी गृहरचना संस्था नियोजित, पुणे व ५.संत मुक्ताई संमिश्र सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादित, पुणे ह्यांची मागणी एकाच जागेबद्दलची असल्यामुळे योग्य प्रमाणात दोहोंना विभागून देण्यास मान्यता देण्यात येत आहे. सदर जागेमधील पाटबंधारे विभागाने केलेल्या बांधकामाचा खर्च संबंधित संस्थांकडून वसूल करण्यात यावा.

सदर संस्थांना महामंडळाची जमीन भाडेपट्टयाने देण्यापूर्वी ह्या विषयाबाबत महसूल खात्यास संदर्भ करुन शासकीय प्रचलित कार्यप्रणाली अवगत करुन त्यानुसारच जमीन भाडेपट्टयाने देण्याची कार्यवाही करण्याची ~~यावी~~, इतीकरण ह्याच बैठकीत करण्यात येत आहे.

'गुरुकुल' अभिनव पद्धतीची शाळा चालविणाऱ्या सरस्वती एज्युकेशनल सोसायटी, पुणे ह्यांना दिलेल्या जमिनीच्या भाडेपट्टयाची मुदत ५ वर्षावरुन ३५ वर्षे करण्यास मान्यता देण्यात येत आहे. सदर संस्थेकडून वाढीव कालावधीसाठी भाडेपट्टयात वाढ करण्यासाठी प्रयत्न करण्यात यावेत.''

ठराव क्र.१८/५

''ठराव करण्यात येतो की, कोयना टप्पा-४(ब), जादा सिंचन विमोचक, कोयना धरणाच्या सांडव्यावरील दरवाजांना झडपा बसविणे इ. कामे करण्यासाठी व त्याकरिता आवश्यक ते सर्वेक्षण व अन्वेषण तातडीने करण्याचे संदर्भात मा.इं.श्री.त्रिं.देवकुळे, सल्लागार महामंडळ यांनी मा.विनय बन्सल, प्रधान सचिव (नियोजन) व सदस्य यांचेबरोबर ह्या कामाच्या एकूणच प्राधान्याबाबत चर्चा करावी.''

| | | |
|---|---|---|
| मा. मंत्री (पा) व अध्यक्ष | | कार्यकारी संचालक |
| म.कृ.खो.वि.म., पुणे | | म.कृ.खो.वि.म. पुणे |

ठराव क्र.१८/६

``ठराव करण्यात येतो की, महामंडळाचे कार्यक्षेतील प्रकल्पांवर, पाणी पट्टी वसुलीच्या प्रचलित पद्धतीमध्ये खालीलप्रमाणे बदल करण्यास नियामक मंडळाची मान्यता देण्यात येत आहे.

बदल : कालवा शाखा स्तरावरुन देयके खातेदारास पाठविण्याच्या तारखेपासून, देयके भरणा करण्याचा ३ महिन्यांचा अनुज्ञेय कालावधी संपल्यावर चौथ्या महिन्यासाठी १०% विलंब शुल्क आकारण्यात यावे व त्यापुढील प्रत्येक महिन्यासाठी २% जादा विलंब शुल्क आकारण्यात यावे.''

ठराव क्र. १८/७

``ठराव करण्यात येतो की,

१. महामंडळाच्या कार्यक्षेतील 'नाबार्ड' अर्थसहाय्यित तसेच अनुशेषांतर्गत प्रकल्पांसाठी महामंडळाच्या अर्थसंकल्पामध्ये पुरेशी तरतूद करण्यात यावी व सदरचा निधी कार्यकारी संचालक यांनी संबंधित प्रकल्पांसाठी प्राधम्याने उपलब्ध करुन द्यावा.

२. महामंडळाच्या स्थापनेनंतर नाबार्डमार्फत राबविण्यात येणाऱ्या प्रकल्पांवरील आजतागायत मिळालेली प्रतिपूर्तीची रक्कम महामंडळास मिळावी व भविष्यकाळातही ह्या प्रकल्पांवरील प्रतिपूर्तीची रक्कम महामंडळास मिळावी, अशी शासनास विनंती करण्यात यावी.''

ठराव क्र. १८/८

``ठराव करण्यात येतो की, कृष्णा पाणी तंटा लवाद निर्णयानुसार मे २००० पर्यंत होणारी निर्माण पाणीसाठा क्षमता व पाणीवापर (utilization) तसेच प्रत्यक्षातील निर्मित पाणीसाठा याचा प्रकल्पनिहाय तपशील व त्यामध्ये कमतरता असल्यास त्याची कारणे व त्यासाठी करावयाच्या उपाययोजना याबाबतचा अहवाल पुढील बैठकीमध्ये मांडण्यात यावा.''

ठराव क्र. १८/९

``ठराव करण्यात येतो की, महामंडळाने उभारलेल्या रोख्यांची परतफेड करण्यासाठी महामंडळाच्या कार्यक्षेत्रातील पाटबंधारे प्रकल्पांवरच्या सामाजिक व आर्थिक उन्नतीमुळे राज्य शासनास पाटबंधारे विभागांसह इतर विविध विभागांतर्गत मिळणारा एकूण महसूल व त्यातील वाढीचा हिस्सा (Equity) महामंडळास शासनाकडून प्राप्त होण्यासाठीचा प्रस्ताव शासनास पाठविण्यात यावा. तसेच जलविद्युत प्रकल्पांसाठी वापरण्यात येणाऱ्या पाण्याचे स्वामित्वशुल्क महामंडळास मिळावे अशी विनंती शासनास करण्यात यावी.''

मा. मंत्री (पा) व अध्यक्ष
म.कृ.खो.वि.म., पुणे

कार्यकारी संचालक
म.कृ.खो.वि.म. पुणे